Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। शनिवार, दि. २७ जून २०२६ । वर्ष १ । अंक ८० । पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306
DIGITAL EDITION

**काळाचौकी पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचाऱ्यांसाठी मोफत वैद्यकीय शिबिर**

(पान २ वर)



## आंतरराष्ट्रीय नशाविरोधी दिनानिमित्त धुळ्यात २.०९ कोटींचे जप्त अंमली पदार्थ नष्ट

# 23 गुन्ह्यांतील मुद्देमालाचा पर्यावरणपूरक नाश!

## 'नशामुक्त भारत' अभियानाला बळ; पोलीस मुख्यालयात व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम उत्साहात

**जन सम्राट टाईम्स**

धुळे: आंतरराष्ट्रीय नशाविरोधी दिनाचे औचित्य साधत धुळे जिल्हा पोलिसांनी मोठी कारवाई करत विविध पोलीस ठाण्यांमध्ये जप्त करण्यात आलेल्या तब्बल २ कोटी ९ लाख ४९ हजार ३८० रुपयांच्या अंमली पदार्थांचा पर्यावरणपूरक पद्धतीने नाश केला. गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम अंतर्गत दाखल असलेल्या २३ गुन्ह्यांतील जप्त मुद्देमाल नियमानुसार नष्ट करण्यात आला.



पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य तसेच धुळे जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार चाळीसगाव रोड, मोहाडीनगर, पश्चिम देवपूर, दोंडाईचा, थाळनेर, शिंदखेडा आणि शिरपूर शहर या सात पोलीस ठाण्यांमधील जप्त अंमली पदार्थांची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून २६ जून रोजी धुळे पोलीस मुख्यालयात खड्डयात टाकून पर्यावरणपूरक पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली. या कारवाईवेळी धुळे जिल्हास्तरीय प्रादेशिक अंमली पदार्थ नाश समितीचे अध्यक्ष तथा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक स्वाती काकडे, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, प्रभारी पोलीस उपअधीक्षक (गृह) अभिजीत सोनवणे, तहसीलदार अतुल शेवाळे तसेच सहाय्यक रासायनिक विश्लेषक अतुल पाटील उपस्थित होते. समितीच्या सदस्यांनी गुन्ह्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करून मुद्देमालाची मोजणी केली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बारे यांच्या उपस्थितीत शासकीय पंचांच्या साक्षीने पंचनामा करण्यात आला. ही संपूर्ण कारवाई यशस्वी करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### बहुउद्देशीय सभागृहात जनजागृती कार्यक्रम

व्यसनमुक्ती केंद्र आणि जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस मुख्यालयातील बहुउद्देशीय सभागृहात जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. १७ ते २३ जूनदरम्यान साजऱ्या करण्यात आलेल्या 'नशामुक्त भारत सप्ताहाचा' समारोप या कार्यक्रमाने झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार (भा.प्र.से.) यांनी भूषविले, तर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश इंगळे आणि समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त देविदास नांदगावकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

---

**Selected**

### पत्रकारांना धमकावणे म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आघात;

नशिराबाद | प्रतिनिधी पत्रकारांना कथितरित्या अश्लाघ्य शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या प्रकरणाचे राज्यभर पडसाद उमटत असताना, नशिराबाद पत्रकार संघानेही या घटनेचा तीव्र निषेध नोंदवत संबंधित खासदार संजय दिना पाटील यांच्यावर तातडीने गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. शुक्रवारी पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी नशिराबाद पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. निवेदनात पत्रकारांवरील अशा प्रकारच्या धमक्या आणि दबावाचे प्रकार लोकशाहीसाठी धोकादायक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सत्य आणि वस्तुनिष्ठ पत्रकारिता करणाऱ्या माध्यम प्रतिनिधींना धमकावणे म्हणजे केवळ पत्रकारांचाच नव्हे, तर संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचाही अवमान असल्याचे पत्रकार संघाने स्पष्ट केले.

---

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## बंडखोर खासदारा विरोधात 'जोडे मारो' आंदोलन!

### राऊत यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक

**जन सम्राट टाईम्स**



**जळगाव | प्रतिनिधी:** उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतून बंडखोरी करून शिंदे गटात प्रवेश केलेल्या सहा खासदारांविरोधात शुक्रवारी जळगावात उद्धव सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. महापालिका परिसरात आयोजित या आंदोलनात बंडखोर खासदारांच्या प्रतीकात्मक प्रतिमांना जोडे मारून निषेध व्यक्त करण्यात आला, तर पक्षाशी निष्ठा राखणारे खासदार संजय राऊत यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून त्यांना पाठिंबा दर्शविण्यात आला. उद्धव सेनेचे महानगरप्रमुख शरद तायडे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात शिवसैनिकांनी बंडखोर खासदारांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. "पक्षाशी गद्दारी करणाऱ्यांचे करायचे काय... खाली डोके, वर पाय!" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनादरम्यान बंडखोर खासदारांच्या प्रतीकात्मक फोटोंना जोडे मारून निषेध नोंदविण्यात आला. याचवेळी पक्षाच्या संकटकाळात ठाम भूमिका घेतल्याचा उल्लेख करत खासदार संजय राऊत यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करण्यात आला. शिवसैनिकांनी त्यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करत निष्ठावंत नेतृत्वाच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचा संदेश दिला. या आंदोलनात उद्धव सेना तसेच महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**पदाधिकाऱ्यांची उपस्थिती**

महिला महानगरप्रमुख मनीषा पाटील, उपजिल्हाप्रमुख प्रा. भाऊसाहेब सोनवणे, तालुकाप्रमुख प्रमोद घुगे, किरण भावसार, गणेश गायकवाड, जिल्हा उपसंघटक योगेश चौधरी, राजेंद्र पाटील, मनसेचे प्रदीप पाटील, विनायक धर्माधिकारी, प्रेमराज राठोड, डॉ. रमाकांत कदम, भीमराव पांडव, संदीप माळी, किशोर धनगर यांच्यासह शिवसेना, युवासेना आणि महिला आघाडीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

---

## पर्यावरण योगदानाचा गौरव; राजेंद्र पाटील यांना 'राष्ट्रीय आयकॉन अवॉर्ड-२०२६'

### निसर्गमित्र समितीतर्फे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते सन्मान

**जन सम्राट टाईम्स**

**धुळे | प्रतिनिधी:** धुळे येथील राजमाता जिजाऊ मातृतीर्थ स्मारक समितीचे अध्यक्ष, सकल मराठा समाजाचे ज्येष्ठ नेते तथा सेवानिवृत्त गटविकास अधिकारी राजेंद्र काळे पाटील यांना निसर्गमित्र समिती, धुळे यांच्या वतीने प्रदान करण्यात येणारा 'राष्ट्रीय आयकॉन अवॉर्ड-२०२६' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. दोंडाईचा येथील हस्ती भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तींना निसर्गमित्र समितीतर्फे



दरवर्षी हा प्रतिष्ठेचा पुरस्कार दिला जातो. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री जयकुमार रावल होते. यावेळी निसर्गमित्र समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रेमकुमार अहिरे, प्रदेशाध्यक्ष डी. आर. पाटील, हस्ती बँकेचे चेअरमन कैलासभाऊ जैन, महासचिव संतोषराव पाटील, राज्य उपाध्यक्ष आर. डी. पाटील, जिल्हाध्यक्ष बापूसाहेब पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र जाधव भदाणे, उपाध्यक्ष विलासराव देसले, विश्वासराव पगार तसेच विक्रमसिंह राजेंद्र काळे आणि सौ. रत्नाताई राजेंद्र काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. राजेंद्र काळे पाटील यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि संघटनात्मक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या सन्मानामुळे धुळे जिल्ह्यासह सकल मराठा समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पुरस्काराबद्दल धुळे राजमाता जिजाऊ मातृतीर्थ स्मारक समिती, धुळे जिल्हा सकल मराठा समाज तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी राजेंद्र काळे पाटील यांचे अभिनंदन केले असून, त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

---

## पारोळ्यात धाडसी चोरी; बिअर शॉपी फोडून ४२ पेट्या बिअरसह रोकड लंपास

**जन सम्राट टाईम्स**

**पारोळा | प्रतिनिधी :** पारोळा शहरातील चोरवड रस्त्यावरील पलक बिअर शॉपीवर अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी करत तब्बल ४२ पेट्या बिअर आणि गल्ल्यातील रोकड लंपास केल्याची घटना बुधवारी पहाटे उघडकीस आली. चोरीनंतर पुरावे नष्ट करण्यासाठी चोरट्यांनी दुकानातील सीसीटीव्ही यंत्रणेचा डीव्हीआरही सोबत नेल्याने परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शॉपीचे मालक योगेश पाटील यांनी मंगळवारी रात्री सुमारे १ वाजेच्या सुमारास नेहमीप्रमाणे दुकान बंद केले होते.

बुधवारी सकाळी दुकान उघडण्यासाठी आल्यानंतर शटर वाकवून चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. चोरट्यांनी दुकानात प्रवेश करून किंगफिशर, कॅननसह विविध नामांकित कंपन्यांच्या सुमारे ४२ पेट्या बिअर तसेच गल्ल्यातील सुमारे ६ हजार रुपयांची रोकड चोरून नेली. विशेष म्हणजे, चोरीचा कोणताही पुरावा मागे राहू नये म्हणून



चोरट्यांनी दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा डीव्हीआरही सोबत नेल्याचे तपासात समोर आले आहे. त्यामुळे पोलिसांसमोर चोरट्यांचा माग काढण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. ही घटना न्यू बालाजी नगर, छोरिया सिटीसारख्या उच्चभ्रू वस्तीच्या परिसरात घडली आहे. तसेच घटनास्थळाजवळ पेट्रोल पंप असल्याने हा परिसर नेहमीच वर्दळीचा असतो. अशा ठिकाणी चोरट्यांनी निर्भयपणे चोरी केल्याने नागरिकांनी सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली आहे. घटनेची माहिती मिळताच पारोळा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, परिसरातील उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

---

## पत्रकारांना धमकी देणाऱ्या वक्तव्याचा निषेध

### सुरक्षिततेसाठी कठोर कारवाईची मागणी



**जन सम्राट टाईम्स**

**धरणगाव | प्रतिनिधी :** ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधताना कथितरित्या धमकीची व अपमानास्पद भाषा वापरल्याच्या घटनेचा धरणगाव तालुका अधिकृत पत्रकार संघातर्फे तीव्र निषेध करण्यात आला. पत्रकारांना निर्भयपणे काम करता यावे, यासाठी शासनाने कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली.

पत्रकार संघाच्या बैठकीत पत्रकार जितेंद्र महाजन यांनी सांगितले की, लोकशाही व्यवस्थेत पत्रकारिता हा चौथा स्तंभ असून शासन, प्रशासन आणि समाज यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून पत्रकार सातत्याने जनतेचे प्रश्न, समस्या आणि वास्तव परिस्थिती समोर आणण्याचे कार्य करतात. अशा परिस्थितीत लोकप्रतिनिधींनी पत्रकारांशी आक्षेपार्ह भाषेत संवाद साधणे ही लोकशाही मूल्यांना धक्का देणारी बाब आहे. मुंबई येथे काही पत्रकार बातमी व मुलाखतीसाठी गेले असताना त्यांच्याशी कथितरित्या अपमानास्पद भाषा वापरण्यात आली. तसेच "माझ्या नादाला लागला तर एकतर हॉस्पिटलमध्ये जाल नाहीतर स्मशानात जाल" आणि "पुन्हा समोर आल्यास मारून पाठवणार" अशा स्वरूपाची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. अशा प्रकारचे वक्तव्य केवळ पत्रकारांचाच नव्हे, तर लोकशाही व्यवस्थेचाही अवमान असल्याचे पत्रकार संघाने म्हटले आहे. पत्रकारांनी प्रश्न विचारल्यामुळे त्यांना धमकावणे, त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करणे आणि दहशत निर्माण करणारी भाषा वापरणे हा लोकशाही प्रक्रियेवर आघात असल्याची भावना उपस्थित पत्रकारांनी व्यक्त केली. अशा घटनांमुळे पत्रकारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनत असून, भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी शासन आणि प्रशासनाने कठोर भूमिका घेणे आवश्यक असल्याचे संघटनेने नमूद केले. धरणगाव तालुका अधिकृत पत्रकार संघाचे अध्यक्ष राजेंद्र वाघ यांनी सांगितले की, कोणतीही व्यक्ती कितीही मोठ्या पदावर असली तरी ती कायद्यापेक्षा मोठी नाही. पत्रकारांना निर्भयपणे आणि निष्पक्षपणे काम करता यावे, हे लोकशाहीसाठी अत्यावश्यक आहे. "लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा अवमान कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही," असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी धरणगाव अधिकृत पत्रकार संघाचे शहराध्यक्ष विनोद रोकडे, ज्येष्ठ मार्गदर्शक ॲड. व्ही. एस. भोलाणे, जितेंद्र महाजन, निलेश पवार, पी. डी. पाटील, ॲड. हर्षल चौहान, विकास पाटील, रविंद्र कंखरे, सुधाकर मोरे, राजू बाविस्कर, सतीश शिंदे, ॲड. स्वप्नील भाटिया, सतीश बोरसे, किरण चव्हाण, मनोज महाजन, वाल्मिक पाटील, विनोद मोरे यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते.

---

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज



## 'ऑपरेशन टायगर : 14 आमदार शिंदेंच्या गळाला!

### मंत्री गुलाबराव पाटील यांचा दावा, पत्रकार परिषदेत खळबळजनक विधान

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी :** महाविकास आघाडीचे ६ खासदार आधीच फुटले असताना, आता 'ऑपरेशन टायगर-३'अंतर्गत उद्धव सेनेचे आणखी १४ पेक्षा जास्त आमदार लवकरच शिंदे सेनेत दाखल होणार असल्याचा खळबळजनक दावा जळगावचे पालकमंत्री तथा शिंदे सेनेचे नेते गुलाबराव पाटील यांनी शुक्रवारी जळगावात पत्रकारांशी बोलताना केला आहे. एकनाथ शिंदेंनी दाढीवर हात फिरवला की 'टायगर सक्सेस'होतो, असं सांगत त्यांनी ठाकरे गटाला खिंडार पाडण्याचा थेट इशारा दिला आहे. उद्धव ठाकरे हे बंडखोर खासदारांच्या मतदारसंघांमध्ये पक्ष मजबुतीसाठी दौऱ्यावर जात असल्याच्या प्रश्नावर गुलाबराव पाटील यांनी जोरदार टोला लगावला. ते म्हणाले, उद्धव ठाकरे दौऱ्यावर जातायत तर गेलेच पाहिजे. पण, जे काम मुलाला (आदित्य ठाकरे) जमले नाही, ते आता बापाला (उद्धव ठाकरे) स्वतः मैदानात उतरून करावे लागत आहे. ठाकरे गटाकडून पक्ष सावरण्यासाठी सुरू असलेली ही धडपड निष्फळ ठरेल, असेही त्यांनी सुचवले. राज्यात लवकरच तिसरा मोठा राजकीय भूकंप होणार असल्याचे संकेत देताना पाटील म्हणाले की, सध्या 'ऑपरेशन टायगर-३' वेगाने सुरू आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सध्या जास्त बोलत नाहीत, ते फक्त शांतपणे आपल्या दाढीवर हात फिरवताहेत. खुद्द आदित्य ठाकरेंनीही ही गोष्ट जाहीरपणे मान्य केली आहे की, जेव्हा जेव्हा एकनाथ शिंदे दाढीवर हात फिरवतात, तेव्हा समजून जावे की 'टायगर'चे ऑपरेशन सक्सेस झाले आहे.

यावेळी १४ पेक्षा जास्त आमदार आमच्याकडे येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.महाविकास आघाडीचे ६ खासदार आधीच फुटले असताना, आता 'ऑपरेशन टायगर-३'अंतर्गत उद्धव सेनेचे आणखी १४ पेक्षा जास्त आमदार लवकरच शिंदे सेनेत दाखल होणार असल्याचा खळबळजनक दावा जळगावचे पालकमंत्री तथा शिंदे सेनेचे नेते गुलाबराव पाटील यांनी शुक्रवारी जळगावात पत्रकारांशी बोलताना केला आहे. एकनाथ शिंदेंनी दाढीवर हात फिरवला की 'टायगर सक्सेस'होतो, असं सांगत त्यांनी ठाकरे गटाला खिंडार पाडण्याचा थेट इशारा दिला आहे. उद्धव ठाकरे हे बंडखोर खासदारांच्या मतदारसंघांमध्ये पक्ष मजबुतीसाठी दौऱ्यावर जात असल्याच्या प्रश्नावर गुलाबराव पाटील यांनी जोरदार टोला लगावला.

### संजय पाटलांनी माफी मागायला हरकत नाही

खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना धमकी दिल्याचा प्रकार घडला, त्यावर गुलाबराव पाटील यांनी पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे, संजय पाटलांनी माफी मागायला काही हरकत नाही, असे सांगत त्यांनी या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. गुलाबराव पाटील यांच्या या 'ऑपरेशन टायगर-३' च्या दाव्यामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा प्रचंड खळबळ उडाली असून, विरोधकांचे कोणते १४ आमदार शिंदे गटाच्या वाटेवर आहेत, यावरून आता तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

# धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी नाजिया इलाही खान यांच्यावर कारवाईची मागणी!

## धरणगाव पोलीस ठाण्यात मुस्लिम समाजाचे निवेदन

जन सम्राट टाईम्स




**धरणगाव:** दिल्ली येथील नाजिया इलाही खान यांनी सोशल मीडियावर केल्याचा आरोप असलेल्या कथित वक्तव्यामुळे मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप करत धरणगाव शहरातील मुस्लिम समाज व सर्व पंच कमेटीच्या वतीने धरणगाव पोलीस ठाण्यात निवेदन सादर करण्यात आले. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांच्याबाबत कथितरित्या आक्षेपार्ह वक्तव्य करण्यात आल्याने मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या असून समाजात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. कोणत्याही धर्मातील श्रद्धास्थान, पूजनीय व्यक्ती किंवा धार्मिक भावना यांचा अवमान होणे हे सामाजिक सलोखा, बंधुता आणि राष्ट्रीय एकात्मतेस बाधक ठरू शकते, असेही निवेदनात म्हटले आहे. भारतीय न्याय संहितेतील संबंधित तरतुदींनुसार गुन्हा नोंदवून या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली. यावेळी मुस्लिम समाजाचे पंच नगर मोमीन यांनी प्रशासनाला आवाहन करत शहरातील शांतता, सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी या प्रकरणाची संवेदनशीलता लक्षात घेऊन तातडीने आवश्यक ती पावले उचलावीत, असे सांगितले. सदर निवेदन धरणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उमाकांत गायकवाड यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. निवेदन सादर करताना नगरसेवक हाजी इब्राहिम, माजी नगरसेवक अहमद पठाण, करीम सय्यद, नगर मोमीन, रियाज बागवान, करीम खान, नदीम काझी, समद मणियार, रहेमान शाह, याकुब खान, हमीद पठाण, सज्जाद अली, शेख रहीम, साजिद कुरेशी, मो. मोईन, अजहरभाई, फखरोद्दीन मोमीन, दस्तगीर मणियार, साजिद शेख, सरफराज मोमीन, कलीम मोमीन यांच्यासह मुस्लिम समाजातील विविध संघटनांचे पदाधिकारी, मशिदींचे ट्रस्टी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तातडीने आवश्यक ती पावले उचलावीत

कोणत्याही धर्मातील श्रद्धास्थान, पूजनीय व्यक्ती किंवा धार्मिक भावना यांचा अवमान होणे हे सामाजिक सलोखा, बंधुता आणि राष्ट्रीय एकात्मतेस बाधक ठरू शकते, असेही निवेदनात म्हटले आहे. भारतीय न्याय संहितेतील संबंधित तरतुदींनुसार गुन्हा नोंदवून या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली. यावेळी मुस्लिम समाजाचे पंच नगर मोमीन यांनी प्रशासनाला आवाहन करत शहरातील शांतता, सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी या प्रकरणाची संवेदनशीलता लक्षात घेऊन तातडीने आवश्यक ती पावले उचलावीत, असे सांगितले.

# काळाचौकी पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचाऱ्यांसाठी मोफत वैद्यकीय शिबिर

## तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी

जन सम्राट टाईम्स



**मुंबई। प्रतिनिधी :** पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने काळाचौकी पोलीस ठाण्यात सोमवार, २२ जून २०२६ रोजी मोफत वैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. दैनंदिन तणावपूर्ण आणि धावपळीच्या कामकाजामुळे पोलीस कर्मचाऱ्यांच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष होते. ही बाब लक्षात घेऊन आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी सहभाग घेत पोलीस कर्मचाऱ्यांची सखोल आरोग्य तपासणी केली. तसेच विविध आजारांबाबत मार्गदर्शन, आवश्यक वैद्यकीय सल्ला आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या. या शिबिरात डॉ. प्रागजी वाजा, डॉ. वैशाली शेलार, डॉ. सुनीता निकम, डॉ. शशिकांत पवार, डॉ. अजय पुरी, डॉ. मुकुंद धोत्रे, डॉ. गुलाब गुप्ता आणि डॉ. रोहन राम ठाकूर यांनी वैद्यकीय सेवा देत पोलीस कर्मचाऱ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. कार्यक्रमास माजी नगरपाल डॉ. जगन्नाथ हेगडे, विभागीय नगरसेविका सुप्रिया दळवी तसेच मनसेच्या पदाधिकारी ग्रेसी सिंग यांनी उपस्थिती लावली. यावेळी महिला पोलीस निरीक्षक गायकवाड, पोलीस निरीक्षक कुंभार, पोलीस उपनिरीक्षक सागर बनकर तसेच सपोनि हसन मुलाणी यांच्यासह अनेक पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या आरोग्य शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विजय निगडकर यांचे विशेष सहकार्य लाभले. शिबिराच्या माध्यमातून पोलीस कर्मचाऱ्यांना वेळेवर आरोग्य तपासणी, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेचे महत्त्व समजावून देण्यात आले. पोलीस दल समाजाच्या सुरक्षेसाठी चोवीस तास कार्यरत असते. अशा परिस्थितीत त्यांच्या आरोग्याची नियमित काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. याच उद्देशाने आयोजित करण्यात आलेले हे मोफत वैद्यकीय शिबिर पोलीस कर्मचाऱ्यांसाठी उपयुक्त ठरले असून, भविष्यातही अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# करिष्मा नायर यांची पिंपरखेड प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट!

## आरोग्य योजनांचा सविस्तर आढावा

जन सम्राट टाईम्स



**भडगाव । प्रतिनिधी :** जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर यांनी भडगाव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, पिंपरखेड येथे भेट देत आरोग्य केंद्राच्या कामकाजाची सविस्तर पाहणी केली. यावेळी विविध राष्ट्रीय आरोग्य योजनांचा आढावा घेत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना दिल्या. भेटीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी NQAS, HPV लसीकरण, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) क्लेम, 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियान, दैनंदिन ओपीडी व आयपीडी सेवा, प्रसूती सेवा, पल्स पोलिओ मोहीम, औषधांचा साठा, साथीच्या रोगांवरील नियंत्रण तसेच स्टॉप डायरेक कॅम्पेन आदी विषयांचा सविस्तर आढावा घेतला. आरोग्य केंद्रात सुरू असलेल्या HPV लसीकरण मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी तसेच PMJAY क्लेमच्या उत्कृष्ट कामकाजाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करत संबंधित वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. भविष्यातही नागरिकांना दर्जेदार आणि वेळेवर आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी अधिक प्रभावी नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतिक भोसले, आरोग्य निरीक्षक संजय सोनार कळवाडीकर, आरोग्य सहाय्यक प्रदीप डाके, आरोग्य सहायिका भारती हरणे, औषध निर्माण अधिकारी विकास धुमाळ, रियंका पावरा, उदय जोशी, संगीता बाविस्कर, गट प्रवर्तक शिला कोळी, आशा महाजन, वाहनचालक अशोक बडगुजर यांच्यासह आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या या भेटीमुळे प्राथमिक आरोग्य केंद्रातील सेवा अधिक सक्षम आणि गुणवत्तापूर्ण करण्यास निश्चितच बळ मिळणार असल्याची भावना उपस्थित कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

### वेळेवर आरोग्य सेवा उपलब्ध

आरोग्य केंद्रात सुरू असलेल्या HPV लसीकरण मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी तसेच PMJAY क्लेमच्या उत्कृष्ट कामकाजाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करत संबंधित वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. भविष्यातही नागरिकांना दर्जेदार आणि वेळेवर आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी अधिक प्रभावी नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतिक भोसले, आरोग्य निरीक्षक संजय सोनार कळवाडीकर, आरोग्य सहायिका भारती हरणे, औषध निर्माण अधिकारी विकास धुमाळ, रियंका पावरा, उदय जोशी, संगीता बाविस्कर, गट प्रवर्तक शिला कोळी, आशा महाजन, वाहनचालक अशोक बडगुजर यांच्यासह आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

# शेतशिवार रस्त्याअभावी शेतकरी अडचणीत !

जन सम्राट टाईम्स

**कढोली ता एरंडोल । प्रतिनिधी :** पावसाळ्याची सुरुवात होत असून खरीप हंगामातील पेरणीची लगबग सुरू झाली आहे. पेरणीसाठी आवश्यक असलेले बियाणे, खते तसेच शेतीची अवजारे शेतात पोहोचविणे कठीण होत असल्याने शेतकरी चिंतेत आहेत. रस्त्याअभावी ट्रॅक्टर, पेरणी यंत्रे व इतर वाहने शेतापर्यंत पोहोचू शकत नसल्याने पेरणीची कामे वेळेत पूर्ण करण्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

काही ठिकाणी शेतकऱ्यांना साहित्य डोक्यावर किंवा छोट्या वाहनांद्वारे नेण्याची वेळ आली आहे. त्यामुळे खर्चात वाढ होण्याबरोबरच वेळेचाही अपव्यय होत आहे. शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे अनेकदा शेतरस्त्यांची दुरुस्ती व नव्याने रस्ते उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. मात्र अद्याप ठोस कार्यवाही न झाल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. पेरणीचा हंगाम लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने शेतरस्त्यांचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे."शेतात जाण्यासाठी रस्ताच नसल्याने पेरणी कशी करायची?"शेत रस्ता मोकळा करण्यासाठी रवंजे येथील शेतकऱ्यांचे एरंडोल प्रांत अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे मागणी :---- रवंजी येथेही अशाच प्रकारची समस्या असल्याने गेल्या काही महिन्यांपासून शेत शिवार रस्ताच नसल्याने ऐनवेळी पेरणीच्या हंगामात शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत पेरणीसाठी लवकरात लवकर शेत शिवार रस्ता मोकळा करण्यासाठी येथील शेतकऱ्यांनी एरंडोल प्रांत अधिकारी यांना निवेदन दिले आहे.

# एन. ई. एस. हायस्कूल, पारोळा येथे 'सीड बॉल्स' कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## विद्यार्थ्यांनी तयार केले तब्बल १,००० सीड बॉल्स

जन सम्राट टाईम्स



**पारोळा (प्रतिनिधी):** पर्यावरण संवर्धन आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने एन. ई. एस. हायस्कूल, पारोळा येथे आयोजित करण्यात आलेल्या सीड बॉल्स निर्मिती कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सुमारे एक हजार सीड बॉल्स तयार करत पर्यावरण रक्षणासाठी आपले योगदान नोंदविले. याचबरोबर शाळा परिसरात वृक्षारोपण करून निसर्ग संवर्धनाचा संकल्पही करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी सीड बॉल्स कॅम्पेनचे समन्वयक राहुल निकम यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे वाढते महत्त्व, प्रदूषणाचे दुष्परिणाम, घटते वनक्षेत्र आणि जैवविविधतेच्या संरक्षणाची गरज याविषयी मार्गदर्शन केले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यानंतर विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष सीड बॉल्स निर्मिती कार्यशाळा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी माती, शेणखत आणि सेंद्रिय खत यांचे मिश्रण करून त्यामध्ये विविध देशी वृक्षांच्या बिया रोवून सीड बॉल्स तयार केले. कार्यशाळेत तयार करण्यात आलेल्या जवळपास १,००० सीड बॉल्सचा आगामी पावसाळ्यात विविध ठिकाणी वापर करून वृक्षसंवर्धनाला चालना दिली जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. या उपक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, उन्हाळी सुट्टीत विद्यार्थिनींनी विविध देशी वृक्षांच्या बियांचे संकलन केले होते. शाळा उपक्रम प्रमुख धर्मेंद्र शिरोळे यांच्या मार्गदर्शनाखाली एन. ई. एस. गर्ल्स विद्यालयातील विद्यार्थिनींनी केलेल्या या बियासंकलनाचा उपयोगच सीड बॉल्स तयार करण्यासाठी करण्यात आला. एन. ई. एस. बॉईज व गर्ल्स विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष केशवअण्णा क्षत्रिय, मुख्याध्यापक जोगी सर, अहिरे सर, जे. बी. सोनवणे, संजय मोरे, धर्मेंद्र शिरोळे, चंद्रशेखर पाटील यांच्यासह शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समारोपावेळी विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने कार्य करण्याचा, अधिकाधिक वृक्ष लागवड व त्यांचे संवर्धन करण्याचा निर्धार व्यक्त केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता वाढण्यासोबतच निसर्गाप्रती जबाबदारीची भावना अधिक दृढ झाली.

# तीन ते चार महिन्यांपासून वृद्धापकाळ अनुदान रखडले

जन सम्राट टाईम्स



**एरंडोल । प्रतिनिधी :** वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्यांचे आर्थिक गणित कोलमडले असतानाच एरंडोल तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना आणि इंदिरा गांधी निराधार योजनेअंतर्गत वृद्धापकाळ अनुदान घेणाऱ्या अनेक ज्येष्ठ नागरिकांना गेल्या तीन ते चार महिन्यांपासून अनुदान मिळाले नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. त्यामुळे अनेक वृद्धांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असून उपासमारीची वेळ येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. वृद्धापकाळ अनुदानावरच आपला दैनंदिन खर्च भागवणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांकडे उत्पन्नाचे अन्य कोणतेही साधन नसल्याने त्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. औषधोपचार, अन्नधान्य, वीजबिल तसेच इतर अत्यावश्यक गरजा भागविण्यासाठी त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अनेक लाभार्थ्यांनी संबंधित विभागाकडे वारंवार पाठपुरावा करूनही अनुदानाची रक्कम अद्याप त्यांच्या बँक खात्यात जमा झालेली नसल्याची तक्रार केली आहे. अनुदान वितरणातील विलंबामुळे ज्येष्ठ नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. नियमित अनुदान मिळाले नाही तर अनेक वृद्धांना दैनंदिन जीवन जगणेही कठीण होणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. वाढत्या महागाईच्या काळात शासनाच्या सामाजिक सुरक्षा योजनाच अनेक गरजूंसाठी जीवनाचा आधार ठरत आहेत. मात्र त्याच योजनांचे अनुदान रखडल्याने लाभार्थ्यांच्या अडचणी अधिकच वाढल्या आहेत. दरम्यान, संबंधित प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन प्रलंबित अनुदान तातडीने लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करावे, अशी जोरदार मागणी ज्येष्ठ नागरिकांकडून केली जात आहे. शासनाने नियमितपणे अनुदान वितरित करून वृद्धांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

> कलाबाई सपकाळे (रा. खेडी खुर्द) म्हणाल्या, "गेल्या तीन ते चार महिन्यांपासून वृद्धापकाळ योजनेचे अनुदान मिळालेले नाही. त्यामुळे मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नसल्याने उसनवारी करून उदरनिर्वाह करावा लागत आहे. शासनाने नियमितपणे वृद्धापकाळ योजनेचे अनुदान खात्यात जमा करावे, हीच आमची अपेक्षा आहे."

# ग्रामसेवक असूनही नसल्यासारखी परिस्थिती

## स्वच्छता आणि विकासकामे ठप्प

जन सम्राट टाईम्स

**कढोली| प्रतिनिधी:** एरंडोल तालुक्यातील रिंगणगाव ग्रामपंचायतीत गेल्या दीड ते दोन महिन्यांपासून ग्रामसेवकांच्या अनुपस्थितीमुळे प्रशासनाचा कारभार अक्षरशः ठप्प झाला आहे. नियमित ग्रामसेवक आजारी रजेवर असल्याने त्यांच्या जागी अतिरिक्त महिला ग्रामसेवकाची नियुक्ती करण्यात आली असली, तरी त्यांना आर्थिक व्यवहार व सह्यांचे अधिकार नसल्याने ग्रामपंचायतीची अनेक महत्त्वाची कामे रखडली आहेत. परिणामी गावातील पाणीपुरवठा, स्वच्छता आणि विकासकामांवर मोठा परिणाम झाला असून ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गावातील पिण्याच्या पाण्याच्या पाइपलाइनमध्ये अनेक ठिकाणी गळती झाली आहे. मात्र संबंधित दुरुस्तीची कामे मंजुरीअभावी रखडली असून, या गळतीमुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होत आहे. पावसाळ्यातही नागरिकांना पाणीपुरवठ्याच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याने ग्रामस्थ संताप व्यक्त करत आहेत. दरम्यान, ग्रामपंचायतीचा कार्यकाळ संपल्यामुळे येथे प्रशासक म्हणून भानुदास मते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र ग्रामसेवकांकडे आर्थिक अधिकार नसल्याने आवश्यक निधी काढणे शक्य होत नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे गावातील अनेक अत्यावश्यक कामे स्वतःच्या खिशातून खर्च करून करावी लागत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. आतापर्यंत जवळपास ८० हजार रुपये स्वतः खर्च करून विविध कामे मार्गी लावल्याचे त्यांनी सांगितले. पावसाळा सुरू झाल्यानंतर गावातील स्वच्छतेची समस्याही गंभीर बनली आहे. अनेक ठिकाणी पाणी साचले असून महिला स्वच्छतागृहांभोवती मोठ्या प्रमाणात झुडपे वाढली आहेत. अस्वच्छ वातावरणामुळे डेंग्यू, मलेरिया आणि इतर साथीच्या आजारांचा धोका वाढला असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. वेळेत स्वच्छता मोहीम आणि जंतुनाशक फवारणी न झाल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. ग्रामपंचायतीतील प्रशासकीय अडचणींमुळे विकासकामांना पूर्णपणे ब्रेक लागला असून, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि इतर मूलभूत सुविधांचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करून सक्षम ग्रामसेवकाची नियुक्ती करावी, तसेच अतिरिक्त ग्रामसेवकाला आवश्यक अधिकार देऊन प्रलंबित कामे मार्गी लावावीत, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

> "गेल्या दीड महिन्यांपासून अतिरिक्त ग्रामसेवकाची नियुक्ती असली तरी आर्थिक अधिकार नसल्याने कोणतीही कामे होत नाहीत. त्यामुळे गावातील अनेक आवश्यक कामे मला स्वतःच्या खर्चातून करावी लागत आहेत. आतापर्यंत सुमारे ८० हजार रुपये खर्च केले असून याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करूनही दखल घेतली जात नाही.
>
> — भानुदास मते, प्रशासक, रिंगणगाव ग्रामपंचायत

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

# मंडाबाई भाले यांचे तात्काळ पुनर्वसन करा!

## अन्यथा सोमवारपासून 'बिऱ्हाड आंदोलन'चा इशारा;दक्ष पत्रकार संघ व वंचित बहुजन आघाडी आक्रमक!

जन सम्राट टाईम्स



**धुळे । प्रतिनिधी:** धुळे शहरातील जगन्नाथ नगर परिसरात अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या मंडाबाई रघुनाथ भाले यांचे अतिक्रमण असल्याचे सांगत महापालिका प्रशासनाने घर पाडल्याच्या प्रकरणावरून आता आंदोलनाची धार अधिक तीव्र झाली आहे. पीडित कुटुंबाला अद्याप न्याय मिळालेला नसल्याचा आरोप करत दक्ष पत्रकार संघ आणि वंचित बहुजन आघाडीने मंडाबाई भाले यांचे तात्काळ पुनर्वसन करण्याची मागणी केली असून, अन्यथा सोमवारपासून धुळे महापालिका आयुक्त कार्यालयासमोर 'बिऱ्हाड आंदोलन' छेडण्यात येईल, असा इशारा पत्रकार परिषदेत देण्यात आला. मंडाबाई भाले यांच्या कुटुंबीयांचा आरोप आहे की, महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या घरावर कारवाई करताना घराची तोडफोड केली, मालमत्तेचे नुकसान केले तसेच जातिवाचक शिवीगाळही केली. या घटनेनंतर ९ जूनपासून संबंधित कुटुंबीयांनी आमरण उपोषण सुरू केले होते. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई अथवा पुनर्वसनाची प्रक्रिया झालेली नसल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे. दक्ष पत्रकार संघाचे बापू बागुल आणि वंचित बहुजन आघाडीचे शंकर खरात यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, शहरात अनेक प्रभावशाली व्यक्तींकडून मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे करण्यात आली आहेत. मात्र, त्यांच्यावर कारवाई न करता दलित व मुस्लिम समाजातील गरीब नागरिकांनाच लक्ष्य केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी त्यांनी कथित अतिक्रमणांची यादी महापालिका आयुक्तांना दिल्याचा दावा करत, "धनदांडग्यांवरील अतिक्रमणे हटविण्याची हिंमत प्रशासन दाखवणार का?" असा सवाल उपस्थित केला. प्रशासनाने निवडक कारवाई न करता सर्वांसाठी समान न्यायाची भूमिका घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली. मंडाबाई भाले या वृद्ध महिलेचे तात्काळ पुनर्वसन करून त्यांना न्याय द्यावा, अन्यथा सोमवारपासून मनपा आयुक्त कार्यालयासमोर बिऱ्हाड आंदोलन सुरू करण्यात येईल, असा इशारा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. याशिवाय, धुळे येथे आंदोलन करूनही न्याय न मिळाल्यास मुंबईतील सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनादरम्यान राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी मोठे आंदोलन उभारण्यात येईल.

### कारवाई करताना घराची तोडफोड

दक्ष पत्रकार संघ आणि वंचित बहुजन आघाडीने मंडाबाई भाले यांचे तात्काळ पुनर्वसन करण्याची मागणी केली असून, अन्यथा सोमवारपासून धुळे महापालिका आयुक्त कार्यालयासमोर 'बिऱ्हाड आंदोलन' छेडण्यात येईल, असा इशारा पत्रकार परिषदेत देण्यात आला. मंडाबाई भाले यांच्या कुटुंबीयांचा आरोप आहे की, महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या घरावर कारवाई करताना घराची तोडफोड केली, मालमत्तेचे नुकसान केले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306